राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक -१२१३/२०२४/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| तक्रारदार | उत्तरवादी |
|---|---|
| श्रीमती.राजश्री अर्जुन गव्हाने | जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय खेड, ता. खेड,जि. पुणे.<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे. |

(निर्णय दिनांक- ०९/०४/२०२५)

तक्रारदार यांनी दिनांक २३/०९ २०२४/रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केला आहे. तक्रारदार यांनी आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही,वरिष्ठांच्या आदेशाची अमलबजावणी नाही, अशा आशयाची तक्रार केली आहे .

माहितीशी संबंधित द्वितीय अपील क्रमांक ४७८८/२०२३/पुणे यामध्ये आयोगाने दिनांक २४/०७/२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे. त्यानुसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणानी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर उपलब्ध असलेल्या अभिलेखावरून असे स्पष्ट होते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदर प्रकरणात विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय खेड,ता.खेड, जि. पुणे यांनी वर नमूद द्वितीय अपीलामध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार सदरचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात कार्यवाही करावी व तसे तक्रारदार यांना कळवावे जिल्हाधिकारी पुणे यांनी आयोगाच्या आदेशाची अमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी. आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

वरील निर्देशानुसार तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

9.4.25

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

तक्रार क्र.- १२१३/२०२४/पुणे 17699/2025

दिनांक 23/4/2025